सत्यमेव जयते

# एकात्मिक बाल विकास सेवा योजना, आयुक्तालय, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई

| अ.क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविण्याचे विहित मुदत | सेवा पुरविणारे अधिकारी /कर्मचारी यांचे नांव व पदनाम | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिका-यांचे नाव व पदनाम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | **एकात्मिक बाल विकास सेवा योजना**<br>**१) पुरक पोषण आहार :-**<br>६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील मुलांना ५०० उष्मांक आणि १२ ते १५ ग्रॅम प्रथिने, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता ६०० उष्मांक आणि १८ ते २० ग्रॅम प्रथिने तसेच ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील कमी वजनांच्या लाभार्थ्यांना ८०० उष्मांक आणि २० ते २५ ग्रॅम प्रथिने युक्त पुरक पोषण आहार दिला जातो. | एका वर्षात ३०० दिवस आहार दिला जातो. आहार पुरवठयाचे आदेश वर्षभराचे असतात. | अंगणवाडी सेविका | **ग्रामीण-** बाल विकास प्रकल्प अधिकारी (तालुका)<br>जिल्हा कार्यक्रम अधिकारी (बा.क) जिल्हापातळीवर<br><br>**नागरी** :- बाल विकास प्रकल्प अधिकारी संबधित प्रकल्प<br>उप आयुक्त (आरोग्य व पोषण)<br>आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, आयुक्तालय सी बी डी बेलापूर नवी मुंबई. |

| अ.क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविण्याचे विहित मुदत | सेवा पुरविणारे अधिकारी /कर्मचारी यांचे नांव व पदनाम | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिका-यांचे नाव व पदनाम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | **२.लसीकरण :-**<br>● **गरोदर माता व स्त्रियांसाठी**<br>१) पहिल्या तिमाहीत आरोग्य केंद्रात नोंद करणे.<br>२) गर्भवतींनी कमीत कमी ३ प्रस्तुतीपूर्व तपासण्या करणे.<br>३) प्रत्येक भेटीत रक्त दाब तपासून घेणे.<br>४) प्रत्येक भेटीत वजन करून घेणे. शेवटच्या सहा महिन्यांत गर्भवतीचे वजन महिन्यांला १ किलो वाढवणे.<br>५) धनुर्वात प्रतिबंध लसीचे (TT) २ डोस घेणे. पहिल्या व दुस-या तिमाहीत व एक महिन्याच्या अंतराने दुसरा डोस घेणे.<br>६) गर्भवतीने तीन महिने रोज एक लोहयुक्त गोळी घेणे कमीत कमी १०० गोळया घेणे.<br>● **मुलांसाठी** **वयोगट**<br>BCG एक डोस जन्मत:<br>DTP पोलिओ पहिला डोस ६ आठवडे<br>DTP पोलिओ दुसरा डोस १० आठवडे<br>DTP पोलिओ तिसरा डोस १४ आठवडे<br>गोवर एक डोस ९ महिने पुर्ण<br>जीवनसत्व अ पहिला डोस<br>DPT बुस्टर डोस १८ महिने<br>पोलीओ बुस्टर डोस<br>जीवनसत्व अ दुसरा डोस<br>जीवनसत्व अ तिसरा डोस २४ महिने<br>जीवनसत्व अ चौथा डोस ३० महिने<br>जीवनसत्व अ पाचवा डोस ३६ महिने | **लाभार्थी**<br>० ते ६ वर्ष वयोमानाप्रमाणे, तसेच गर्भवती व स्तनदा माता. | अंगणवाडी सेविका/पर्यवेक्षिका / परिचारिका(ANM) वैद्यकिय अधिकारी (संबधित बीटस वरील व प्रकल्पातील) | जिल्हा ग्रामीण अधिकारी (ग्रामीणसाठी) वैद्यकिय अधिकारी (महानगर पालीका /नगरपालीका ) संबधित बाल विकास प्रकल्प अधिकारी/जिल्हा कार्यक्रम अधिकारी (बा.क) |

| अ.क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविण्याचे विहित मुदत | सेवा पुरविणारे अधिकारी /कर्मचारी यांचे नांव व पदनाम | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिका-यांचे नाव व पदनाम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | **३.आरोग्य तपासणी :-**<br>० ते ६ वयोगटातील सर्व बालकांची त्रैमासिक आरोग्य तपासणी नियमितपणे होते. तिव्र कमी वजानांच्या बालकांची तपासणी दर महिन्याला होते/ आवश्यकते प्रमाणे गर्भवतीची तपासणी संपूर्ण गर्भावस्थेत ४ वेळा तपासणी होते.<br><br>**जागतिक आरोग्य सघटनेचे नविन निकष (Child Growth Standards)**<br>यापुर्वी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतील मुलांना १,२,३ व ४ मध्ये विभाजन करण्यात येत होते. व श्रेणी ३ व ४ मधील मुलांना अति कुपोषित संवर्गात मोजले जात होते. परंतू शासनाने जागतिक आरोग्य संघटनेच्या नवीन निकषाची **(Child Growth Standards)** अंमलबजावणी केलेली असून माहे जुन २०१० पासुन नविन निकषानुसार श्रेणीकरण करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत. सदर पुर्वीच्या निकषापेक्षा थोडे वेगळ असुन नविन निकषामध्ये मुलांचे फक्त तिन भागात श्रेणीकरण करण्यात येते. तसेच मुलांच्या आणि मुलींच्या वाढीचे निकष वेगवेगळे असणार आहेत. नवीन निकषामध्ये नवीन तक्त्यावर वजनवाढ मोजल्यानंतर-<br>**३ एसडी म्हणजे तिव्र कमी वजनाची ,२ एसडी म्हणजे मध्यम कमी वजनाची व सर्वसाधारण असे श्रेणीकरण करण्यात आले आहे.** | ० ते ६ वर्ष, मुले, गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांची नियमित तपासणी होते. | अंगणवाडी सेविका/पर्यवेक्षिका / परिचारिका(ANM) वैद्यकिय अधिकारी (संबधित बीटस वरील व प्रकल्पातील) | जिल्हा ग्रामीण अधिकारी (ग्रामीणसाठी) वैद्यकिय अधिकारी (महानगर पालीका /नगरपालीका ) संबधित बाल विकास प्रकल्प अधिकारी/जिल्हा कार्यक्रम अधिकारी (बा.क) |

| अ.क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविण्याचे विहित मुदत | सेवा पुरविणारे अधिकारी /कर्मचारी यांचे नांव व पदनाम | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिका-यांचे नाव व पदनाम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | **४.संदर्भ आरोग्य सेवा :-**<br>० ते ६ वर्ष वयाची मुले, किशोरवयीन मुली, गर्भवती स्त्रिया, स्तनदा माता या लाभार्थ्यांना संदर्भ आरोग्य सेवा दिली जाते. आवश्यकतेनुसार विशेष वैद्यकिय परिक्षण व उपचारासाठी वरील लाभार्थ्यांना वैद्यकिय अधिका-यांकडे संदर्भ देवून पाठविले जाते. | वैद्यकिय सेवा असल्यामुळे अंगणवाडी सेविकेने निदर्शनास आणून दिल्याबरोबर तात्काळ कार्यवाही केली जाते. | अंगणवाडी सेविका/ परिचारिका (ANM) वैद्यकिय अधिकारी | पर्यवेक्षिका व बाल विकास प्रकल्प अधिकारी |
| | **५.अनौपचारिक शिक्षण-**<br>पुर्व शालेय शिक्षण हा एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतील एक अतिशय महत्वांचा सेवा असून ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील बालकांचा सर्वांगीण विकास या सेवेव्दारे साधला जातो. खेळ, गोष्टी, गाणी, बडबड, गिते इत्यादी च्या माध्यमातून अंगणवाडी सेविका मुलांच्या भाषा, सामाजिक शारिरीक बौध्दीक व भावनिक विकास घडवित असते. अंगणवाडीमध्ये पुर्व शालेय शिक्षण दिले जाते. | नियमित दररोज | अंगणवाडी सेविका | पर्यवेक्षिका व बाल विकास प्रकल्प अधिकारी |
| | **६. पोषण व आरोग्य शिक्षण-**<br>१८-४५ वयोगटाच्या महिला ंच्या मासिक दोन बैठका घेणे आवश्यक असते. यामध्ये पोषण आहार व आरोग्य पोषण शिक्षण दिले जाते. गर्भवती स्त्रिया, स्तनदा माता व तीव्र कुपोषित बालके यांच्याकडे गृहभेटी देऊन पोषण आहार व आरोग्य शिक्षणबाबत जागरूकता निर्माण केली जाते. | नियमित गृहभेटी दिल्या जातात. | अंगणवाडी सेविका (नियमितपणे) पर्यवेक्षिका (अधुन मधुन) / संबधित बाल विकास प्रकल्प अधिकारी (नियंत्रणाचा एक भाग म्हणुन) | बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीणसाठी) बाल विकास प्रकल्प अधिकारी (शहरी) जिल्हा कार्यक्रम अधिकारी (बा.क) |